# बचत और खाता

व्यवसायामध्ये खुप मोठ्या प्रमाणावर लाभ असला तरी आपण बचत काय करतो किंवा किती जमा झाली याकडे जर लक्ष दिले नाही तर संतुलन बिघडून जाते व त्या व्यावसायिकाचे दिवाळे सुद्धा निघू शकते. अशा प्रकारे प्रत्येक मनुष्याचे जीवन हे देखील एक कर्माचा व्यापार आहे. कर्माचे श्रेष्ठफळ प्राप्त करण्यासाठी बचत आणि खाता या दोघांकडे बरोबरीने ध्यान ठेवणे आवश्यक आहे.

**कर्माचे खाते -** प्राय सर्व मनुष्यांचा हा सहज स्वभाव असतो की ते आपले धन, दौलत आणि पैसाचा बारीकपणे हिशोब ठेवतात कारण की, कुठे तोटा व्हायला नको. आणि त्यांना कोणी दया देऊ नये. परंतु आपल्याला हा देखील विचार करायला पाहिजे की, आपण आपल्या कर्माच्या लिखापढी (हिसाब-किताब) बद्दल इतके सावध आहे का? जर नाही तर वाईट वृत्ती आणि विकार रुची चोर काहीही आपले सुकर्माचे धन चोरुन घेतील, आणि आपले खाते बिघडून टाकतील. कर्माची ग्रहन गती हीच आहे की, चांगले वाईट प्रत्येक कर्म आपल्या आपल्या संस्काराच्या संचीत निधीवर आवश्यक प्रभाव पाडतात. चांगल्या कर्माने ही निधी वाढते आणि विकर्माने ती क्षीण होते. प्रत्येक मनुष्याला आपल्या चांगल्या वाईट कर्माचे फळ भोगावे लागते ते देखील वेगवेगळे त्यामुळे आपण हा कधीच विचार करायला नको की थोडे चांगले कर्म करुन आपण वाईट कर्माच्या फळापासून वाचू शकतो.

आपण आंतरीक लोकनाद्वारे स्वतः हा अनुभव करु शकतो की, आपले श्रेष्ठ चांगले कर्म सतत आपला पाठलाग करीत असतात. आपण भलेही त्याच्यापासून वाचण्याचा किंवा नजर चोरण्यांचा प्रयत्न केला तरी वाईट कर्माचे खाते नेहमी मनाला खात राहते, पुष्कळदा दुर्लक्ष केल्याने आणि उदासीनतेमुळे हे खाते कमी होण्यांच्या ऐवजी वाढतच जाते. जेव्हा व्यक्ती एक किंवा दोन वेळेस वाईट कर्म करतो तेव्हा तो वाईटपणाच्या जाळ्यात असा अडकतो की, मन त्याला समजावते की, तुझे संस्कारच वाईट आहे आणि तु या वाईट कर्मापासून कधीच सुटू शकत नाही. अशा प्रकारे दुर्बलतेच्या अधिन व्यक्ती पुन्हा-पुन्हा त्याच चुका करतो.

**बचत सुरक्षा कवच आहे -** व्यक्ती आपल्याय जीवनाच्या प्रारंभिक धनाची जी बचत करतो ती रोग, व्याधि, वाईट परिस्थिती तसेच वृद्धकाळामध्ये मदतगार बनते. परंतु फालतू खर्च करणारे आणि दुर्लक्ष करणारे व्यक्ती वाईट परिस्थितीत डोक्याला हात मारत राहत बसतात. अशा प्रकारे मनुष्याला जन्मा-जन्माचा श्रेष्ठ आणि पुण्यकर्माच्या पुंजीचे वा बचतेचे खुप महत्व आहे. स्थूळ धन तर मनुष्य या जन्मात कमवतोही आणि खर्चही करतो. मृत्यूच्यानंतर जर काही सोबत जात असेल तर ते फक्त मनुष्यांच्या सुकर्माचे फळ असते. त्यामुळे पुण्याईची पुंजी जमा करणे खुप आवश्यक आहे आणि विकर्माच्या खात्याला कमी करणे आवश्यक आहे. कारण की, येणाऱ्या वेळेमध्ये वाईट दिवसचा सामना करायला नको. मनुष्याचे सुकर्म आणि पुण्य हेच त्यामध्ये सामावलेले असतात. त्यामुळे पुण्य आणि सुकर्म हीच प्रत्येक व्यक्तिची असली बचत आहे. आणि भविष्याचे सुरक्षा कवच आहे. त्यामुळे जीवनांच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये तन,मन,धन व वेळ आणि शक्ती पुण्याचे खाते करण्यापेक्षा आणि बचत वाढवण्यासाठी उपयोगात आणावे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com